# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक 2007/(322/07) विशि-4 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 (1994 चा महा. 35) च्या कलम 3 च्या पोटकलम (2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली 442605
दुरध्वनी क्रमांक :- 07132-223104 E-mail :- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गों.वि./आस्था./२३८० /2025 — दिनांक 25 /07/2025

## परिपत्रक

***संदर्भ:-  मा. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर यांचे पत्र दिनांक 24/07/2025***

विद्यापीठाशी संलग्नित चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व मा. प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भांकित आदेशानुसार भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार दिनांक 25/07/2025 रोजी चंद्रपुर जिल्ह्यात "रेड अलर्ट" दिलेला असून, चंद्रपुर जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविलेली आहे.

त्याअनुषंगाने चंद्रपुर जिल्ह्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांचा परिणाम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर होऊ नये याकरीता **चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना दिनांक 25/07/2025 रोजी सुट्टी जाहिर करण्याचे संदर्भांकित पत्रान्वये निर्देश प्राप्त आहेत**.

करीता, विद्यापीठाशी संलग्नित **चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना दिनांक 25/07/2025 रोजी सुट्टी जाहिर करण्यात येत आहे.** यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अनिल हिरेखण)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**प्रत माहितीकरीता सविनय सादर:-**

1) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
2) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपुर
3) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
4) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, चंद्रपुर जिल्हा.
5) सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.
6) जनसंपर्क अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रकास प्रसिध्दी द्यावी.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय

E-mail :- chandrapur.rdc@gmail.com फोन - 07172 – 250659

**पत्र क्रं. कावि/समअ/नै.आ./टे-1/2025/1062** दिनांक 24/07/2025

**वाचले :-** 1. **प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांचा दिनांक 24/07/2025 चा हवामान ईशारा.**

2. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005**

**आदेश : -**

**ज्याअर्थी** भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार दिनांक 25/07/2025 रोजी चंद्रपूर जिल्ह्यात "रेड अलर्ट" दिलेला असुन काही ठीकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविलेली आहे.

**आणि ज्याअर्थी** चंद्रपूर जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यावर होऊ नये या करिता चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक,प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये व खाजगी कोचिंग क्लासेस यांना दिनांक 25/07/2025 रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ नितिन व्यवहारे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर, मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 30 (2)(5) व (18) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, **चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये व खाजगी कोचिंग क्लासेस यांना दिनांक 25/07/2025 रोजी सुट्टी जाहिर करीत आहे.** उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करावी.

तरी नागरीकांनी भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी व आपतकालीन परिस्थितीत खालील दिलेल्या ठिकाणी संपर्क साधावा. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर संपर्क क्र. 07172 250077

जिल्हाधिकारी चंद्रपूर

(डॉ नितिन व्यवहारे)

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,

चंद्रपूर

प्रतिलिपी : 1. मा. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांस माहितीस्तव सादर.
2. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
3. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर
4. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे.
5. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाही करीता.
6. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना देण्यात यावी.
7. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना देण्यात यावी.
8. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जि.प.चंद्रपूर
9. संचालक आकाशवाणी केंद्र चंद्रपूर यांनी आपल्या स्तरावरून प्रसिध्दी द्यावी.
10. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर यांना उचित कार्यवाही करिता अग्रेषित.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**